## थोडक्यात...

### पिंपरी देशमुख येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

**परभणी-** जयंतीनिमित्त शिवजयंती मोठ्या उत्साहात व डीजे मुक्त वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व आरती करून करण्यात आली. उपस्थित ग्रामस्थांनी भक्तिभावाने आरतीत सहभाग घेत महाराजांना अभिवादन केले. संपूर्ण परिसरात उत्साहाचे आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. उत्सवानिमित्त सर्वांसाठी भोजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. महिला, पुरुष तसेच युवक मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी केला. गावकऱ्यांच्या एकजुटीने व सहकार्याने डीजे मुक्त, शिस्तबद्ध आणि पारंपरिक पद्धतीने शिवजयंती साजरी करण्यात आली.

### मध्यपुर्व देशांतील युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर हेल्पलाईन नंबर जारी

**परभणी-** मध्यपूर्व व परिसरातील काही देशांमध्ये निर्माण झालेल्या तणावपूर्ण प्रादेशिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारच्या संबंधित दूतावासांनी तेथे वास्तव्यास असलेल्या भारतीय नागरिकांसाठी सुरक्षा ॲडव्हायझरी जारी केली आहे.




**बोरी-जिंतूर तालुक्यातील धमधम येथील धम्मटेकडीवर सामाजिक कार्यकर्ते सुभाष वाव्हळे याच्या पुढाकारातून १०वी विशाल बौद्ध धम्मपरिषद मोठ्या थाटामाटात साजरी झाली. यावेळी भन्ते महानद यानी उपस्थिताना धम्मदेसना दिली.यावेळी सामाजिक कार्यकर्ते अरविद काम्बळे, बौद्धाचार्य शिवाजी लाटे सर, बौद्धाचार्य आनदाराव वाकळे, सामाजिक कार्यकर्ते किरण घोगडे,रत्नदिप शेजावळे, प्रितम वाकळे याची प्रमुख व्याख्याने झाली तर वाल्मिक टाकरस, गजानन कागणे, राहुल घुले यान्ची प्रमुख उपस्थिति होती सायकाळी भोकरदन येथील भीमशाहिर शाहिर विनोद जाधव आणि त्याचा सन्च यानी भीम बुद्ध गीताच्या माध्यमातून समाजप्रबोधन केले. धम्मपरिषद यशस्वितेसाठी मारोती शिन्दे, रमेश प्रधान यशोदाबाई शिन्दे, रगनाथ ताठे, धम्मपाल मोरे यानी परिश्रम घेतले.-(छाया-संतोष तायडे)**

## परभणी जिल्ह्यात कोल्हावाडी येथे पहिली 'बर्तन बँक'




**मानवत -** प्लास्टिकमुक्त गावाच्या दिशेने ठोस आणि आदर्श पाऊल टाकत तालुक्यातील कोल्हावाडी ग्रामपंचायतीने त्रिमूर्ती उत्पादक महिला बचत गटाच्या माध्यमातून जिल्ह्यातील पहिली 'बर्तन बँक' सुरू केली आहे. रविवारी(दि. १)या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला असून भागवत सप्ताहाच्या प्रारंभापासून गावातील सर्व धार्मिक कार्यक्रमांमध्ये स्टीलच्या ताट-वाट्या आणि ग्लासांचा वापर अनिवार्य करण्यात आला आहे. 'माझी वसुंधरा' अभियानात मराठवाडा विभागात अव्वल क्रमांक पटकावलेल्या कोल्हावाडी ग्रामपंचायतीने पर्यावरण संवर्धनाची भूमिका अधिक बळकट करत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला. मानवत तालुक्यातील कोल्हावाडी येथे त्रिमूर्ती उत्पादक गट उमेद व ग्रामपंचायत कोल्हावाडी यांच्या संयुक्त विद्यमाने मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर यांची संकल्पना, प्रकल्प संचालक स्मिता पाटील व तालुका मार्गदर्शक गटविकास अधिकारी शिवाजी कांबळे यांच्या मार्गदर्शनात परभणी जिल्ह्यात पहिली बर्तन बँकेची सुरवात कोल्हावाडी येथे झाली.

## वर्णा येथे तुर पिकाचा प्रक्षेत्र दिन साजरा

**परभणी -** भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली पुरस्कृत व जीवन ज्योत चॅरिटेबल ट्रस्ट ,परभणी संचलित कृषी विज्ञान केंद्र, परभणी यांच्या मार्फत मौजे वर्णा ता. जिंतूर जि.परभणी येथे दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६ रोजी तूर पिकाच्या प्रक्षेत्र दिनाचे आयोजन डॉ. प्रशांत भोसले वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र परभणी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कृषी विज्ञान केंद्रामार्फत वर्णा येथे तुर पिकातील एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन याविषयी आद्यरेषा पीक प्रात्यक्षिकाच्या प्रक्षेत्र दिनाचे आयोजन करण्यात आले होते. कृषी विज्ञान केंद्र, परभणी मार्फत तंत्रज्ञानाचा प्रसार व प्रचार




करण्याच्या दृष्टीने तूर पिकातील एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापनाबाबतचे आद्यरेषा पीक प्रात्यक्षिक शेतकऱ्यांच्या शेतावर राबविण्यात आले होते. या आद्यरेषा पीक प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून तूर पिकातील किडींचे मशागतीय, जैविक, भौतिक, रासायनिक, यांत्रिक पद्धतीचा अवलंब करून एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन कशाप्रकारे करावे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले होते. या प्रक्षेत्र दिनाच्या कार्यक्रम समयी या प्रात्यक्षिकाचा अवलंब केलेल्या शेतकऱ्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना तंत्रज्ञानाचा अवलंब केल्याने शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी होऊन उत्पन्नात वाढ झाल्याचे प्रतिपादन केले. तसेच एकात्मिक कीड व्यवस्थापनाच्या पद्धतींचा अवलंब केल्यामुळे रासायनिक औषधांचा वापर कमी झाल्याबाबत शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. एकात्मिक कीड व रोग तंत्रज्ञानाचा अवलंब यापुढे शेतकऱ्यांनी इतर सर्व पिकात करण्याचा मानस या ठिकाणी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या तांत्रिक सत्रामध्ये कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ.अमोल काकडे यांनी या तंत्रज्ञानाचे व एकात्मिक व्यवस्थापनाचे महत्त्व विषद केले तसेच शेतकऱ्यांनी कीड व रोग व्यवस्थापनासाठी नैसर्गिक पद्धतीचा अवलंब करावा यावर भर दिला. या पुढील उन्हाळी हंगामामध्ये घेण्यात येणाऱ्या महत्त्वाच्या भुईमूग पिकाच्या बीजप्रक्रिया, लागवड पद्धत व त्यातील एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन याबाबत उपस्थित शेतकऱ्यांना माहिती दिली. सदरील कार्यक्रमास गावातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जीवन समृद्ध ज्ञानसंपन्न करण्यासाठी ग्रंथाशी मैत्री महत्त्वाची- शेषराव खटाण

**(सुरज शहाणे/ दै.धर्मयोद्धा)**

**सेलू-** उन्हाळ्यात उष्णतेमुळे उद्भवणाऱ्या आजारांपासून वाचण्यासाठी आणि आरोग्य टिकवण्यासाठी डॉक्टरांनी दिलेले महत्त्वाचे सल्ले खालीलप्रमाणे आहेत:

१. आहार आणि पाण्याचे नियोजन ( Diet & Hydration ) भरपूर पाणी प्या: शरीरातील पाण्याचे प्रमाण टिकवून ठेवण्यासाठी दिवसातून किमान ८-१० ग्लास पाणी प्या. नैसर्गिक पेये: साध्या पाण्यासोबतच शहाळ्याचे पाणी, ताक, लिंबू सरबत आणि ओआरएस (ORS) यांचा समावेश करा. हंगामी फळे: टरबूज, खरबूज, संत्री, द्राक्षे आणि काकडी



यांसारखी पाण्याचे प्रमाण जास्त असलेली फळे खा. काय टाळावे? जास्त मसालेदार, तळलेले पदार्थ, शिळे अन्न आणि कॅफिनयुक्त पेये (चहा-कॉफी) टाळा, कारण यामुळे डिहायड्रेशन वाढू शकते.

२. उन्हापासून संरक्षण ( Sun Protection) बाहेर जाण्याची वेळ: दुपारी १२ ते ४ या वेळेत उन्हात जाणे टाळा. जाणे आवश्यक असल्यास छत्री किंवा टोपीचा वापर करा. कपड्यांची निवड: घाम शोषून घेणारे आणि हवा खेळती ठेवणारे सुती, सैल व फिकट रंगाचे कपडे वापरा. सनस्क्रीन: घराबाहेर पडण्यापूर्वी ३० मिनिटे आधी किमान ३० असलेले सनस्क्रीन लावा.

३. लहान मुले आणि ज्येष्ठांची काळजी ( Care for Vulnerable Groups ) लहान मुलांना आणि वयोवृद्धांना उन्हाचा तडाखा लवकर बसतो, त्यामुळे त्यांच्या हायड्रेशनकडे विशेष लक्ष द्या. लहान मुलांना उन्हाळ्यात ताप किंवा सर्दी-खोकल्याची लक्षणे दिसल्यास तातडीने बालरोगतज्ज्ञांचा सल्ला घ्या.

४. संभाव्य आजार आणि लक्षणे (Common Illnesses ) उष्माघात (Heatstroke): चक्कर येणे, खूप ताप येणे किंवा शुद्ध हरपणे ही लक्षणे दिसल्यास त्वरित डॉक्टरांकडे जा. किडनी स्टोन: उन्हाळ्यात पाण्याचे प्रमाण कमी झाल्यास किडनी स्टोनचा धोका वाढतो, त्यामुळे लघवीचा रंग पिवळा होत असल्यास पाण्याचे प्रमाण वाढवा. इतर आजार: अन्नातून होणारी विषबाधा ( Food Poisoning), कावीळ आणि टायफॉइड यांपासून वाचण्यासाठी स्वच्छ पाणी आणि ताज्या अन्नाचे सेवन करा.

लेखक.डॉ विठ्ठल काकडे (जनरल फिजिशन व बालरोग चिकित्सक ) काकडे हॉस्पिटल येलदरी

## होळीच्या जल्लोषात पाथरीची बाजारपेठ रंगली

**(गणेश जत्ती/दै.धर्मयोध्दा)**

**पाथरी-** भारतीय संस्कृतीत प्रत्येक सण-उत्सवाला विशेष महत्त्व आहे. ऋतूनुसार येणाऱ्या सणांमुळे सामाजिक जीवनात उत्साह आणि आनंदाचे वातावरण निर्माण होते. वसंत ऋतूचे आगमन दर्शविणारा होळीचा सण अवघ्या एक दिवसावर येऊन ठेपला असून पाथरी तालुक्यात व शहरात सणाची लगबग सुरू झाली आहे. मेन रोडसह प्रमुख बाजारपेठेत साखरेच्या हारगाठी, नैसर्गिक रंग, पिचकारी, विविध प्रकारचे रंगबेरंगी गुलाल, तसेच आकर्षक फुगे आणि खेळण्यांनी दुकाने सजविण्यात आली आहेत. लहान मुलांपासून ते युवक-युवतींपर्यंत सर्वच जण रंग व पिचकारी खरेदीसाठी दुकानांत गर्दी करताना दिसत आहेत. किराणा दुकानदारांनीही काजू, बदाम, सुकामेवा यासह पूजेचे साहित्य उपलब्ध करून दिले आहे. दरवर्षी वसंत ऋतूत येणाऱ्या या सणाला ग्रामीण भागात विशेष महत्त्व आहे. जंगलात पळसाच फुले बहरली की ग्रामस्थांना होळीचे वेध लागतात. पारंपरिक पद्धतीने शेणाच्या गोवऱ्या, लाकूड जमा करून होळी प्रज्वलित केली जाते व पूजा-अर्चा करून भक्तिभावाने सण साजरा केला जातो. मात्र बदलत्या काळात काही ठिकाणी सणाचे स्वरूप बदलताना दिसते. मद्यपान, भांडण किंवा अतिरेकी प्रकारांमुळे सणाच्या मूळ उद्देशाला बाधा येऊ नये, अशी अपेक्षा ज्येष्ठ नागरिकांकडून व्यक्त होत आहे. होळीला गाठीचे विशेष महत्त्व होळीच्या सणानिमित्त लहान मुलांना साखरेच्या गाठी वाटण्याची जुनी परंपरा आहे. हारगाठीचे वितरण करून मतभेद विसरून नाते अधिक दृढ करण्याचा संदेश या प्रथेतून दिला जातो. सणाच्या पार्श्वभूमीवर पाथरी येथील बाजारपेठ रंगांनी नटली असून खरेदीसाठी ग्राहकांची मोठी गर्दी होत आहे. होळी व धुळवडीच्या तयारीमुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## पाथरीतील पीएमसी केंद्रीय प्राथमिक शाळा ब्रांचचे जमील सिद्दिकी सर यांचा भावपूर्ण निरोप समारंभ संपन्न

**(गणेश जत्ती/ दै.धर्मयोध्दा)**

**पाथरी-** येथील पीएमसी केंद्रिय प्राथमिक शाळा ब्रँच पाथरी या शाळेतील शिक्षक जमील सिद्दिकी सर दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ रोजी सेवेतून नियमानुसार निवृत्त झाले. त्यांच्या दीर्घ व उल्लेखनीय शैक्षणिक सेवेचा गौरव करण्यासाठी शाळेच्या वतीने भावपूर्ण निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मोईज अन्सारी (माजी नगराध्यक्ष, पाथरी नगर परिषद), मुजीब आलम (नगरसेवक) तसेच साप्ताहिक




पाथरी नगरी चे उपसंपादक अहमद अन्सारी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते जमील सिद्दिकी सर यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. आपल्या भाषणात मोईज अन्सारी यांनी सिद्दिकी सर यांनी शिक्षण क्षेत्रात दिलेल्या योगदानाचा गौरव करताना सांगितले की, "शिक्षक हा समाजाचा खरा शिल्पकार असतो. जमील सिद्दिकी सर यांनी अनेक विद्यार्थ्यांचे भविष्य घडवले असून त्यांची उणीव शाळेला नेहमी जाणवेल." नगरसेवक मुजीब आलम यांनीही त्यांच्या प्रामाणिक, शिस्तबद्ध व विद्यार्थ्यांप्रती असलेल्या जिव्हाळ्याच्या स्वभावाचा उल्लेख केला. अहमद अन्सारी यांनी आपल्या मनोगतातून सिद्दिकी सर यांच्या कार्यकाळातील विविध आठवणींना उजाळा देत त्यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. शाळेतील सहकारी शिक्षक व विद्यार्थ्यांनीही आपल्या भावना व्यक्त करताना सिद्दिकी सर यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली. जमील सिद्दिकी सर यांनी आपल्या मनोगतातून सेवाकाळातील अनुभव कथन करताना शाळा, विद्यार्थी व सहकाऱ्यांबद्दल ऋण व्यक्त केले. "विद्यार्थ्यांच्या यशातच शिक्षकाचे खरे समाधान असते," असे भावनिक उद्गार त्यांनी यावेळी काढले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शाळेच्या शिक्षकवर्गाकडून करण्यात आले. भावपूर्ण वातावरणात हा निरोप समारंभ संपन्न झाला.

## दिल्ली मद्य धोरण प्रकरणात सत्याचा विजय! राऊज एव्हेन्यू कोर्टाने अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया यांच्यासह सर्व २३ आरोपींना निर्दोष मुक्त केले

**(असद शेख/ दै.धर्मयोध्दा)**

**पूर्णा-** दिल्लीतील तथाकथित मद्य धोरण प्रकरण मध्ये आम आदमी पार्टीचे (आप) राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल, माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्यासह सर्व २३ आरोपींना राऊज एव्हेन्यू कोर्टाने निर्दोष मुक्त केले आहे. हे निर्णय सत्य, न्याय आणि लोकशाहीचा मोठा विजय असल्याचे मत परभणी जिल्हा आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष शेख हुसेन यांनी व्यक्त केले आहे.

शेख हुसेन यांनी जारी केलेल्या प्रेस नोटमध्ये म्हटले आहे की, गेल्या काही वर्षांत या प्रकरणाला प्रचंड राजकीय रंग देण्यात आला. "मद्य घोटाळा" असा प्रचार करून जनतेसमोर एक ठराविक प्रतिमा उभी करण्यात आली. छापे, अटका आणि माध्यमांतील चर्चांमुळे आरोप सिद्ध झाल्याचा आभास निर्माण करुन. दिल्ली विधानसभा निवडणुकीपूर्वी आप आणि केजरीवाल यांची बदनामी करण्यात आली आणि त्याचा राजकीय फायदा घेण्यात आला. परंतु न्यायालयाने पुराव्यांच्या आधारे दिलेल्या निर्णयाने हे स्पष्ट केले की हा खटला तथ्यांपेक्षा राजकीय सूडबुद्धीवर आधारलेला होता. कोर्टाने निरीक्षण केले की, "कोणत्याही व्यापक षड्यंत्र किंवा गुन्हेगारी हेतूचा अभाव आहे" आणि सीबीआयच्या चार्जशीटमध्ये प्रक्रियात्मक त्रुटी, पुराव्यांचा अभाव आणि अंतर्गत विरोधाभास आहेत. कोर्टाने सीबीआयच्या तपास अधिकाऱ्याविरुद्ध विभागीय चौकशीचे आदेशही दिले आहेत. केजरीवाल यांनी या खोट्या प्रकरणात सुमारे सहा महिने (१७७ दिवस) कारावास भोगला, तर सिसोदिया यांना जवळपास दोन वर्षे (५१० दिवस) तुरुंगवास भोगावा लागला. जे दिल्ली राज्य भाजपला स्पर्धेतून जिंकता आले नाही, ते केंद्रातील मोदी सरकारने कपटनीतीने निवडून आलेल्या प्रामाणिक सरकारला पंगू करण्यासाठी तपास यंत्रणांचा गैरवापर केला, असा ठाम आरोप शेख हुसेन यांनी केला आहे. एका निवडून आलेल्या मुख्यमंत्र्याला आणि शिक्षणक्रांती घडवणाऱ्या शिक्षण मंत्र्याला दीर्घकाळ तुरुंगात ठेवणे ही लोकशाहीसाठी चिंताजनक बाब होती.

भारतीय जनता पार्टी आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली राजकीय विरोधकांना संपवण्यासाठी तपास यंत्रणांचा वापर झाला, असा आरोप करताना शेख हुसेन म्हणाले की, सूडाच्या राजकारणासाठी न्यायप्रक्रियेचा गैरवापर करणे धोकादायक आहे. अशा प्रकारे संस्थांचा वापर करून निवडून आलेल्या सरकारांना अस्थिर करण्याचा प्रयत्न भारतीय लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांना बाधा पोहोचवतो.

या निर्णयामुळे केवळ आपच्या नेतृत्वाला न्याय मिळालेला नाही, तर देशातील लोकशाही संस्थांवरील विश्वास दृढ झाला आहे. सत्य कितीही दडपण्याचा प्रयत्न केला तरी शेवटी ते समोर येतेच, असे ते म्हणाले.

परभणी युनिटच्या वतीने शेख हुसेन यांनी जनतेला विश्वास दिला की, आप शिक्षण, आरोग्य, वीज, पाणी आणि पारदर्शक प्रशासनाच्या अजेंड्यावर ठाम राहील. खोट्या आरोपांनी जनसेवेचा मार्ग थांबणार नाही, उलट या संघर्षाने बांधिलकी अधिक बळकट झाली आहे. लोकशाहीत मतभेद असू शकतात, पण सूडबुद्धीचे राजकारण आणि न्यायप्रक्रियेचा गैरवापर घातक आहे. सर्व लोकशाहीवादी शक्तींना संस्थात्मक स्वायत्तता, पारदर्शकता आणि न्यायासाठी एकत्र उभे राहण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

सदर प्रकरणात आरोपींना डिस्चार्ज केले असले तरी सीबीआयने या निर्णयाविरोधात दिल्ली हायकोर्टात अपील दाखल केले आहे.

## झिरो फाटा येथे ५ किलोहून अधिक गांजा जप्त; तिघांविरुद्ध गुन्हा

**(असद शेख/ दै.धर्मयोध्दा)**

**पूर्णा -** स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने झिरो फाटा परिसरात उभारलेल्या नाकाबंदी दरम्यान शुक्रवारी (२७ फ ब्रुवारी) रात्री तब्बल ५ किलो ११० ग्रॅम गांजा जप्त केला. या प्रकरणी पूर्णा पोलीस ठाण्यात तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, २७ फेब्रुवारी रोजी झिरो फाटा परिसरातून गांजाची तस्करी होणार असल्याची गोपनीय माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. त्यानुसार टोल नाक्याजवळ नाकाबंदी लावून वाहनांची तपासणी सुरू करण्यात आली. या वेळी वसमत दिशेकडून येणारी -३८--६२६८ क्रमांकाची पल्सर मोटारसायकल संशयास्पद हालचाली करताना दिसली. पोलिसांनी गाडी थांबवून चौकशी केली असता चालकाने आपले नाव आदीनाथ नागोराव चव्हाण तर सोबत्याने हानीफ नुरमिया शेख असे सांगितले. बॅगेची तपासणी करण्याबाबत विचारणा केल्यावर दोघांनीही घाईगडबडीत बॅग घटनास्थळी फेकून दिली आणि मागून आलेल्या विनानंबर स्प्लेंडर मोटारसायकल वरील अनोळखी व्यक्तीसोबत पळ काढला. पोलिसांनी तात्काळ पाठलाग केला, मात्र तिघेही शेताच्या दिशेने धावत पसार होण्यात यशस्वी ठरले.

घटनास्थळी सोडलेल्या बॅगेची तपासणी केल्यावर त्यात गांजा असल्याचे स्पष्ट झाले. यासोबत पल्सर मोटारसायकल आणि एक बॅग असा एकूण १ लाख ८ हजार ७७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यात अंदाजे २८ हजार ७७० रुपयांची किंमत असलेला ५ किलो ११० ग्रॅम गांजा आणि सुमारे ८० हजार रुपयांची मोटारसायकल समाविष्ट आहे. या कारवाईची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्यात आली. पोलीस निरीक्षक विवेकानंद पाटील आणि पोलीस निरीक्षक विलास गोबाडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक जगताप, पोउपनि चंदनसिंह परिहार, पोउपनि श्रीनिवास पडलवार, रवीकुमार जाधव, रंगनाथ दुधाटे, केशवराज लटपटे, सचिन भदरगे, रंजित आगळे, गजानन क्षीरसागर, निलेश परसोडे, दिपक मुदीराज, साने आदींच्या पथकाने ही संयुक्त कारवाई यशस्वीपणे पार पाडली.

सहायक पोलीस निरीक्षक जगताप यांच्या फिर्यादीवरून आदीनाथ नागोराव चव्हाण, हानीफ नुरमिया शेख आणि स्प्लेंडर मोटारसायकलवरील अनोळखी चालकाविरुद्ध पूर्णा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक गोबाडे करीत आहेत.

## २२ महिन्यांनंतर शेतकऱ्याला जनावरांचा ताबा; गौशाळेची याचिका फेटाळली

**परभणी-** मागील २२ महिन्यांपासून गौशाळेत ठेवण्यात आलेल्या गोवंश जनावरांचा ताबा संबंधित शेतकऱ्याला देण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालय च्या औरंगाबाद खंडपीठाने दिले आहेत. न्यायमूर्ती मेहरोज के. पठाण यांनी गौशाळेची याचिका फेटाळत हा निर्णय दिला. दि. ४ एप्रिल २०२४ रोजी परभणी तालुक्यातील पेडगाव येथील शेतकरी शेख युनुस चाँद (वय ५६) यांची ९ गोवंश जनावरे पोलिसांनी जप्त केली होती. त्यानंतर ही जनावरे ब्राह्मणगाव येथील माता इंद्रायणी गौशाळेत देण्यात



आली होती. शेतकऱ्याने केलेल्या पाठपुराव्यानंतर सत्र न्यायालय, परभणी यांनी दि. ३१ मे २०२५ रोजी जनावरांचा ताबा शेतकऱ्याला देण्याचे आदेश दिले होते. मात्र त्या आदेशाविरुद्ध गौशाळेने उच्च न्यायालयात याचिका दाखल करून स्थगिती मिळवली होती. सुनावणीदरम्यान शेतकऱ्यांच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला की, गौशाळेच्या निष्काळजीपणामुळे एका जनावराचा मृत्यू झाला असून उर्वरित जनावरांचा गैरवापर व बेकायदेशीर भाडेपट्टी केल्याचे पुरावे सादर करण्यात आले. यामध्ये गुगल लोकेशनसह फोटो, गावकऱ्यांची शपथपत्रे व पोलिस अहवाल न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले. सर्व कागदपत्रे व युक्तिवाद विचारात घेऊन खंडपीठाने सत्र न्यायालयाच्या निर्णयात हस्तक्षेप करण्याचे कारण नसल्याचे नमूद करत जनावरांचा ताबा शेतकऱ्याला देण्याचे व त्यांची योग्य देखभाल करण्याचे आदेश दिले. या प्रकरणात शेतकऱ्यांच्या वतीने ॲड. सईद शेख यांनी बाजू मांडली. त्यांना ॲड. सिद्धेश जाधवर व ॲड. शोएबोद्दीन सिद्दीकी (परभणी) यांनी सहकार्य केले.

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्मयोध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक-शिंदे रामेश्वर गणपतराव**

DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao